# विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय

## बचतधाम विश्रामगृह समिती
## जाहीर सूचना

या कार्यालयाच्या अधिनस्त असणाऱ्या सेक्टर १०, सीबीडी बेलापूर येथील बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविण्यास देणे प्रस्तावित आहे.

सदरहू उपाहारगृह भाडेतत्वावर चालविण्यास इच्छुक व्यक्तींकडून दि. २९.०५.२०२५ ते दि. ०६.०६.२०२५ पर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची अधिक माहिती, अर्जाचा नमुना, इत्यादी (www.http://divcomkonkan.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रस्तुत सिलबंद दरपत्रक (लिफाफा अ व ब)अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांचे नावे विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय, पहिला मजला, इमारत कक्ष, रूम नं.११९ अ, कोकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०६.०६.२०२५ पर्यंत (सार्वजनिक सुटटीचे दिवस वगळून) सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व दिनांक ०९.०६.२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांचे दालनात उघडण्यात येईल.

सही/-XXX

सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती
तथा अपर आयुक्त(सामान्य प्रशासन)
कोकण विभाग

साशा/इमारत/कक्ष-१/बचतधाम-उपाहारगृह/२०२५
दिनांक : २८ .०५.२०२५
(संपर्क क्र.०२२-२७५७१५०१)

## बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविणेबाबत माहिती...

❖ बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृहाचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे-:

| अ.क्र. | सेवा | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | उपाहारगृह | १३१.२९ चौ. मी. |
| २ | स्वयंपाकगृह | २५.६० चौ. मी. |
| ३ | भांडारगृह | १०.८५ चौ. मी |

### दरपत्रक संदर्भात नियम व अटी

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>नियम व अटी</th></tr>
<tr><td>१</td><td>मोहोरबंद पाकीटात दरपत्रक समक्ष दिनांक २९.०५.२०२५ ते दिनांक ०६.०६.२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावीत. त्यावर *बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह चालविणेबाबत दरपत्रक* असा स्पष्ट उल्लेख असावा. सदरहू दरपत्रक अर्जासोबत लिफाफा अ) मध्ये आवश्यक ती माहिती कागदपत्रासह व लिफाफा ब) मध्ये दरपत्रक नमुद करुन दोन स्वतंत्र लिफाफे या कार्यालयास सादर करावेत. दरपत्रक दिनांक ०९.०६.२०२५ रोजी दुपारी २.३० वाजता उघडण्यात येईल. दरपत्रक उघडण्याच्या वेळी दरपत्रक धारक यांना हजर राहता येईल.</td></tr>
<tr><td>२</td><td>लिफाफा ब (व्यवसायिक) मध्ये पुढील तक्त्यात दर सादर करावेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१</td><td>मासिक भाडे रक्कम कमीत कमी रक्कम रूपये ४००००/- (अक्षरी रक्कम रूपये चाळीस हजार मात्र) + व त्यापेक्षा अधिक (बोली मुल्य)</td></tr>
<tr><td colspan="2">१. जो निविदाधारक जास्तीचा दर (Highest Rate) देईल त्यांची निवड करण्यात येईल.<br>२. तसेच व्यावसायिक लिफाफयामध्ये सादर करण्यात येणारे दर निविदाधारकाने त्यांच्या लेटर हेडवर सादर करावे व त्यावर निविदाधारकाचा सही व शिक्का असणे बंधणकारक आहे.</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३</td><td>दरपत्रधारक यांनी इसाऱ्याची/ बयाना (EMD) रक्कम रुपये २०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) या कार्यालयातील इमारत कक्ष, पहिला मजला, कोंकण भवन येथे जमा करावी. इसाऱ्याची रक्कम भरल्यानंतर इमारत कक्षाकडून प्राप्त झालेली पावती दरपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. इसाऱ्याची रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सोबत सादर केलेला नसल्यास दरपत्रक ग्राह्य धरले जाणार नाही.</td></tr>
<tr><td>४</td><td>सदरहू बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह चालविण्याचा कालावधी दिनांक .०६.२०२५ ते दिनांक . .२०२६ (कार्यारंभ आदेश दिल्यापासून १ वर्ष) असा असेल.</td></tr>
<tr><td>५</td><td>प्रत्येक संस्थेने फक्त एकच दरपत्रक देण्याची परवानगी आहे.</td></tr>
<tr><td>६</td><td>वस्तू व सेवाकर नोंदणी क्रमांक / अथवा GST नंबर नसल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.</td></tr>
<tr><td>७</td><td>आयकर, GST इत्यादी तसेच नियमानूसार जे शासकीय कर लागू आहेत ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.</td></tr>
<tr><td>८</td><td>यशस्वी दरपत्रकधारकाने राज्य शासन/ केंद्र शासनाने निश्चित केलेले नियम / परिपत्रकाचे पालन करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>९</td><td>संस्था/दुकान विषयक नोंदणी दाखला (Shop Act) , पोलीस परवाना ,अन्न व औषध(Food and drug administration/ food inspector ) यांचेकडील उचित दाखला नियमानूसार फि भरून स्वत: निविदाधारकाने द्यावयाचे आहे.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| १० | उपहारगृहाकरीता नियमानूसार योग्य ते सिलेंडर वापरणे आवश्यक आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| ११ | जो दरपत्रकधारक/निविदाधारक जास्तीत जास्त मासिक भाडे रक्कम दर्शविल, त्याची निविदा मंजूर करण्यात येईल. |
| १२ | उपहारगृहाचा वापर हा संबंधित यशस्वी निविदाधारकानेच करावयाचा असून अन्य कोणालाही परस्पर भाडयाने अगर विक्रीने हस्तांतरण करता येणार नाही. |
| १३ | उपहारगृहाकरीता नेमण्यात येणा-या स्टाफची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी. नियुक्त केलेल्या स्टाफचे पोलीस व्हेरीफीकेशन करणे अनिवार्य आहे. |
| १४ | भाडेकरारनाम्यासाठी येणारा खर्च स्टॅम्पपेपर, मसूदा फी, रजिस्ट्रेशन फी इत्यादी खर्च हा निविदाधरकाने स्वत: करावयाचा आहे तसेच भाडेकरारनामा स्वखर्चाने नोंदणीकृत करून घेणे बंधनकारक आहे. |
| १५ | निविदाधारकास उपहारगृहा व्यतिरिक्त इतर जागेचा वापर करता येणार नाही. मिळकत ज्या कारणासाठी घेतली आहे त्याचा वापर त्याच कारणासाठी होणे बंधनकारक आहे. |
| १६ | उपहारगृहाच्या जागेत समाजावर विपरीत परिणाम होईल असा व्यवसाय कराता येणार नाही. तसेच स्फोटक पदार्थाचा साठा, मद्य, नशा येणा-या पदार्थाची साठवण व विक्री करता येणार नाही तसे आढळून आल्यास आपला करार तात्काळ संपुष्टात येईल. उपहारगृहाकरीता लागणारे व्यावसायिक सिलेंडर वापरासाठी परवानगी असेल परंतू त्याचा साठा करता येणार नाही. तसेच घरगुती सिलेंडर वापरासाठी परवानगी नसेल. Fire audit&Fire safety चे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. |
| १७ | उपहारगृहात बालकामगारांना ठेवण्यात येवू नये. कर्मचा-यांचे गणवेश स्वच्छ असावेत. |
| १८ | निविदाधारकास मुदतीपूर्वी व्यवसाय बंद करावयाचा असल्यास कमीत कमी ०३ महिनेची नोटिस या कार्यालयास देणे आवश्यक आहे. |
| १९ | दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting, पांढरी शाई लावणे टाळावे, चुकून तसे करावे लागल्यास पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार बचतधाम विश्रामगृह समितीने राखून ठेवले आहेत. |
| २० | यशस्वी दरपत्रक धारकास दरपत्रक सफल झाल्याचे कळल्यापासून सुरक्षा अनामत ठेव रक्कम रुपये ५०,०००/- या कार्यालयाकडे राष्ट्रीयकृत बँकेचे डी. डी. व्दारे भरणा करावी. डी. डी. **"बचतधाम समिती कोकण भवन"** या नावाने काढावा. करारनामा कालावधी संपूष्टात आल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल. |
| २१ | कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके फेटाळण्याचा अधिकार मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा अध्यक्ष, बचतधाम विश्रामगृह समिती यांना राहतील. |
| २२ | उपाहारगृहातील खाद्य पदार्थांचा दर्जा व सेवा अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नियमानूसार, योग्य दर्जाची असने बंधनकारक आहे. |
| २३ | उपाहारगृहाची जागा व परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी यशस्वी दरपत्रक धारकाची राहील. |
| २४ | बचतधाम विश्रामगृहाकरीता येणाऱ्या **एकूण वीज व पाणी देयकाच्या रक्कमेतील १०% वीजेच्या** व पाण्याच्या देयकाचा भरण्या करण्याची जबाबदारी यशस्वी दरपत्रक धारकाची असेल. |
| २५ | बचतधाम विश्रामगृहातील उपाहारगृह चालविण्याकरीता नोंदणीकृत महिला बचतगटास प्राधान्य देणेत येईल. |
| २६ | बचतधाम विश्रामगृहाच्या मालमत्तेचे कोणत्याही स्वरुपाचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील व अशी नुकसान भरपाई एक महिन्याच्या आत करुन देणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| २७ | निविदाधारकास सदर कामाच्या शासकीय कार्यालयाचा/ निम्न शासकीय कार्यालयाचा इत्यादी कार्यालयांना सेवा पुरविल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. निविदाधारकाने त्यांची संस्था काळया यादीत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| २८ | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचे दर हे वाजवी असणे आवश्यक आहे. |
| २९ | बचतधाम विश्रामगृहात येणाऱ्या शासकीय, निमशासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता तसेच बाहेरील खाजगी व्यक्तींकरीता जेवण, चहापानाची व्यवस्था सकाळी ०७.०० ते रात्री १०.०० पर्यंत करणे बंधनकारक राहील. तसेच आवश्यक असल्यास ग्राहकांना त्यांचे आरक्षित कक्षामध्ये सेवा देणे आवश्यक राहील. |
| ३० | बचतधाम विश्रामगृहाच्या उपाहारगृहाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा भरणा ***बचतधाम समिती कोंकण भवन*** या नावाने करण्यात यावा. तसेच सदर भरणा दरमहा १० तारखेपूर्वी जमा करणे आवश्यक आहे. |
| ३१ | उक्त सेवांबाबत दरपत्रकधारकाने उपहारगृहात नेमलेल्या व्यक्तींबाबत भविष्यात काही अपघात, जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही. तसेच त्याबाबत दरपत्रकधारक व संबंधित व्यक्तीस कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. |
| ३२ | दरपत्रकधारकास वरील सर्व नियम व अटी मान्य असल्यास त्यांनी याबाबत रुपये ५००/- च्या बॉन्ड पेपरवर लेखी करारनामा नोटरी करुन या कार्यालयास १० दिवसांच्या आत सादर करावा. |

सही- xxx
सदस्य बचतधाम विश्रामगृह समिती
तथा अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
कोकण विभाग

# नमुना अर्ज

दिनांक :-

प्रति,
मा.अध्यक्ष,
बचतधाम समिती तथा
विभागीय आयुक्त, कोकण विभाग,
कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४

विषय :- बचतधाम विश्रामगृह येथील उपाहारगृह भाडेतत्वावर चालविणेबाबत...

महोदय,

आपले कार्यालयाकडील जाहीर सूचना क्रमांक साशा/कक्ष-१/इमारत/बचतधाम-उपाहारगृह/२०२५ दिनांक .०५.२०२५ अन्वये सदस्य, बचतधाम विश्रामगृह समिती तथा अपर आयुक्त(सामान्य प्रशासन), कोकण विभाग यांनी आपले कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या माहिती, नियम व अटीनुसार मी उपाहारगृह चालविण्याच्या जागेचे भाडेबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

मी दरपत्रकाबाबतच्या सर्व नियम व अटी मान्य करतो.

| अ.क्र. | आवश्यक माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव | |
| २ | मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी | |
| ३ | दरपत्रकधारक एजन्सीचा संपूर्ण पोष्टाचा पत्ता | |
| ४ | वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक/ अथवा प्रमाणपत्र | |
| ५ | इसान्याची रक्कम भरलेली पावती क्रमांक व दिनांक | |
| ६ | सदर व्यवसायासाठी आवश्यक असलेले शासकीय व अन्य परवाने क्रमांक व दिनांक (सोबत प्रती जोडणे आवश्यक आहे) | |
| ७ | Food safety and standard License certificate | |
| ८ | Police परवाना | |
| ९ | आधारकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |
| १० | पॅनकार्ड क्रमांक (सोबत प्रत जोडावी) | |
| ११ | Shop Act/ Partnership Act संबंधित कागदपत्र | |
| १२ | शासकीय/ निम्न शासकीय कार्यालय/ इत्यादी कार्यलयांना सेवा पुरवठा केल्याबाबतचे प्रमाणपत्र/ कार्यारंभ आदेश | |
| १३ | निविदाधारकाची संस्था काळया यादीत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | |

आपला विश्वासू,

(दरपत्रकधारकाचे नाव व स्वाक्षरी)